# पं. भवाळकरांच्या बंदिशीने केले तल्लीन

राजापूर, ता. २० : डोंगराच्या माथ्यावरून अवखळपणे वाहणाऱ्या मृडानी नदीच्या शिवपिंडीवर संततधारा पडणाऱ्या धबधब्याची गाज, त्याच्या जोडीला ढोलकी-संगीताचा नाद याचा अनोखा संगम साधत पंडित उदय भावाळकर यांनी गायलेल्या सुरेल आवाजातील बंदिशींनी श्री धूतपापेश्वर मंदिरामध्ये श्रावणी सोमवारी साऱ्यांना श्री शंभोच्या आराधनामध्ये तल्लीन केले. निमित्त होते मित्रमेळा आणि आसमंत बेनेव्होलन्स यांच्यातर्फे श्रावणी सोमवारी (ता. १५) श्री धूतपापेश्वर मंदिरामध्ये पंडित भवाळकर यांची आयोजित केलेल्या शिवरंजनी संगीत मैफलीचे.

कोलकत्ता येथील ध्रुपद संगीत गायक पंडित श्री. भवाळकर यांच्या या मैफलीचा राग गुणकली या पारंपरिक बंदिशीने प्रारंभ झाला. यामध्ये शिवशंभोची आराधना झाल्यानंतर राग हिंडोल आण राग भटीयार आळवत त्याद्वारे शिवशंभोची स्तुती करण्यात आली. मध्यंतरानंतर शुद्ध सारंग रागामध्ये मैफलाचा प्रारंभ करताना त्यांनी साऱ्यांना भक्तिसागरात डुबविले. तप शिवरंजनी रागावर आधारित शंकराचार्य रचित शिवपंचाक्षरी स्तोत्र सादर करून सुमारे तीन तास रंगलेल्या या मैफलीचा समारोप केला. त्यांनी शिव शंकर शंभो, हरी हरी कुंजा नावे, नादभेट अपरांपरा, शिव शिव शंकर शंभो, डमरू हरहर बाजे आदी एकापेक्षा एक सरस बंदिशी सादर करून वाहव्वा मिळविली. पखवाजसाथ प्रसाद आव्हाड, तानपुरा प्रसन्न विश्वनाथ आणि बाळकृष्ण केळकर यांनी दिली. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी मित्रमेळा ग्रुप आणि आसंमत संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी मेहनत घेतली. कार्यक्रमाला तालुक्यासह चिपळूण, देवरूख, रत्नागिरी येथील रसिक उपस्थित होते.



**राजापूर : श्री धूतपापेश्वर मंदिरामध्ये 'शिवरंजनी' संगीत मैफल रंगविताना पंडित उदय भवाळकर आणि सहकारी.**